# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२११२८
२५६२११२९
ई–मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे–४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निवि/४२०

दिनांक : १६/११/२०२१

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.
मा. विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग.

**विषय** :– विद्यापीठ वर्धापनदिन पुरस्कार सन २०२१–२०२२.
संदर्भ :– या कार्यालयाचे पत्र क्र. साफुपुवि/निवि/३९८ दि. ११.१०.२०२१

महोदय/महोदया,

कृपया उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रान्वये विद्यापीठ वर्धापनदिन पुरस्कार सन २०२१–२०२२ साठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाच्या छापील प्रती विद्यापीठ कार्यालयास दि. १५.११.२०२१ पर्यंत सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते.

तथापि, महाराष्ट्र परिवहन मंडळ कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बससेवा विस्कळित झालेली होती. त्यामुळे सदर प्रस्तावाच्या छापील प्रती विहित मुदतीत विद्यापीठ कार्यालयास सादर करता आल्या नाहीत, तरी सदर प्रस्तावाच्या छापील प्रती सादर करण्यास मुदतवाढ मिळावी, अशा आशयाचे विनंती अर्ज विद्यापीठास प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाच्या छापील प्रती विद्यापीठ कार्यालयास सादर करण्यास **दि. १८.११.२०२१ पर्यंत मुदतवाढ** देण्यात येत आहे, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

मात्र, ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाच्या छापील प्रती दि. १८.११.२०२१ पर्यंत विद्यापीठ कार्यालयास सादर न केल्यास, या पुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपली विश्वासू,

16.11.21

(डॉ. वैशाली साकोरे)
उपकुलसचिव